# APPENDIX –D

## <u>Participants Consent Form</u>

**<u>संमती पत्र</u>**

**सहभागी व्यक्तीचे नाव:—** **तारिख:—**

**पत्ता/ संपर्क:—**

**हुद्दा /व्यवसाय:—**

**सहभागी व्यक्तीचे वय/लिंग:—**

बि.पि.पि.व्हि. (BPPV) असलेल्या व्यक्तीमध्ये ऑडिओव्हेस्टिब्युलर प्रोफाइल (Audiovestibular Profile) व जीवनाचा दर्जा याबाबत केल्या जाणाऱ्या संशोधन कार्याची सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे.

तसेच विविध ऑडिओव्हेस्टिब्युलर चाचण्या, व डिझेनेस हॅन्डिकॅप (Dizziness Handicap) प्रश्नावली याबाबतच्या संपूर्ण प्रकियेची माहिती मला देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे व्हिडिओनिस्टॅग्मोग्राफी (videonystasmography) चाचणी, त्यासाठी लागणारा वेळ व त्याची संभाव्य लक्षणे याबाबत माहिती देण्यात आली आहे. सदरच्या तपासण्या हानिकारक नसुन त्याचे कोणतेही दूष्परिणाम नसल्याबाबत मला सांगण्यात आले आहे.

माझा संशोधन कार्यातील सहभाग गोपनिय ठेवण्याबाबत व मी कोणत्याही क्षणी माझा संशोधन कार्यातील सहभाग काढुन घेऊ शकतो/शकते याबाबत मला कळविण्यात आले आहे.

वरिल संपूर्ण माहिती मि वाचली असून सदरच्या संशोधन कार्यातील सहभागासाठी माझी संमती आहे.

**रूग्णाची सही** **तारिख:**

**रूग्णाचे नाव.** **ठिकाण:**

# APPENDIX-E

## Participant’s Information Sheet

## सहभागी व्यक्तीसाठी माहिति पत्र

**बी.पी.पी.व्हि. असलेल्या व्यक्तिंमध्ये ऑडिओव्हेस्टिब्युलार प्रोफाईल व जीवनाचा दर्जा**

**स्कुल ऑफ ऑडिओलॉजी व स्पिच लॅग्वेंज पॅथॉलॉजी, भारती विदयापीठ डिमड् युनिव्हर्सिटी,**

**पुणे –सातारा रोड, पुणे . ४११०४३**

**सर/मॅडम**

वरिल संशोधन कार्यात स्वेच्छेने सहभागी होण्यासाठी आपणास विनंती करण्यात येत आहे. ....................................... यांचे मार्गदर्शनाखाली .................................. हया संशोधक म्हणून काम करीत आहेत. एथीक्स कमिटी (Ethics Committee) भारती विदयापीठ यांनी सदरच्या संशोधन अभ्यासासाठी मान्यता आहे. सहभागी होऊ इच्छित असल्यास त्याबाबतच्या निर्णय घेण्यासाठी या माहितीचा उपयोग तुम्हाला होणार आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे:–**

चक्कर येणाऱ्या व्यक्तिंमध्ये (बी.पी.पी.व्हि.) ऑडिओव्हेस्टिब्युलार चाचणीचे फायदे शोधणे याबाबतचा अभ्यास हे प्रथम उद्दिष्ट आहे. बी.पी.पी.व्हि. चे कारण माहिति नसते किंवा हि स्थिती अंतकर्णाच्या दोषामुळे देखील असु शकते.

बी.पी.पी.व्हि. चे माहिति नसलेले स्वरूप, कारण वा अंतर्कणाचा दोष हे विविध चाचण्याद्वारे शोधने गरजेचे आहे. जेणेकरून बी.पी.पी.व्हि. करिता किंवा इतर दोषांकरिता रूग्णाचे पुनवर्सन करणे शक्य होईल. म्हणुन बी.पी.पी.व्हि. विविध चाचण्याद्वारे शोधण्यासाठी, प्राथमिक व, द्वितीय बी.पी.पी.व्हि. असणाऱ्या व्यक्तिची ऑडिओव्हेस्टिब्युलर प्रोफाईल (Audiovestibular Profile) चा अभ्यास व्हिडिओनिर्स्टेग्मोग्राफी व व्हेम्प (Videonystusmography and VEMP) या चाचण्यांद्वारे करणे गरजेचे आहे.

बी.पी.पी.व्हि. असलेल्या व्यक्तिमध्ये जीवनाचा दर्जा याबाबतचा अभ्यास करणे हे दुसरे उदिद्ष्ट आहे. त्यासाठी एक प्रश्नावली वापरण्यात येते. या प्रश्नावलीमध्ये विविध शारिरिक स्थिती (Domains) जसे कि मानसिक स्थिती व सामाजिक संबंध इत्यादींचा समावेश आहे. .पाश्चिमात्य देशांमध्ये विविध डिझिनेस हॅन्डिकॅप प्रश्नावली (Dizziness Handicap Inventories) वापरून बी.पी.पी. व्हि. असलेल्या व्यक्तिमध्ये जीवनाचा दर्जा याबाबत अभ्यास केला गेला आहे. चक्कर येणाऱ्या व्यक्तिंमध्ये विविध प्रकारचे अपंगत्व असल्याचे निदर्शनास आले आहे. जीवनाचा दर्जा यामध्ये

संस्कृतीनिहाय व व्यक्तिशः विविधता आढळून आली आहे. त्यामुळे भारतीय संस्कृतीमधील विविध बी.पी. पी.व्हि. असलेले व्यक्तिमध्ये जीवनाचा दर्जा अभ्यासणे हे द्वितिय उदिद्ष्ट आहे.

तसेच विविध ऑडिओव्हेस्टिब्युलर प्रोफाईल व जीवनाचा दर्जा यामध्ये सुसंगतता बघणे हे या अभ्यासाचे चवथे उद्दिष्ट आहे. त्याद्वारे कोणती चाचणी महत्वपूर्ण आहे हे स्पष्ट होईल म्हणून बी.पी.पी.व्हि. असलेल्या व्यक्तिमध्ये . ऑडिओव्हेस्टिब्युलर प्रोफाईल व जीवनशैली हे बघण्यासाठी सदर संशोधन कार्य करण्याचे ठरविले आहे.

**संशोधन कार्याची पद्धती :—**

संशोधन अभ्यासासाठी एकूण १३० व्यक्तिंचा सहभाग आवश्यक आहे. बी.पी.पी.व्हि. असलेले ९० व्यक्ति व बी.पी.पी.व्हि. नसलेले ४० व्यक्ति. बी.पी.पी.व्हि. व्यक्तिसाठी असलेली केसहिस्टी व ऑडीओव्हेस्टिष्युलार टेस्ट जसे कि व्हिडिओनिर्स्टेग्मोग्राफी आणि डिझिनेस हॅन्डिकॅप प्रश्नावली मराठीतून केले जातील. व्हिडिओनिर्स्टेग्मोग्राफी साठी Infrared Video Comera असलेले गॉगल्स घातले जातील. एका विशिष्ट दिशेने एकटक बसण्यासाठी सांगण्यात येईल. एका तपासणीसाठी कानामध्ये ४५ सेंकदासाठी कोमट आणि थंड हवा सोडण्यात येईल ज्यामुळे २ मिनिटांसाठी चक्कर येऊ शकते.

व्हेम्प (VEMP) चाचणी करण्यासाठी तुमच्या मानेवर इलेक्ट्रोडस् (electrodes) ठेवले जातील व एका विशिष्ट बाजूकडे मान वळवण्यास सांगण्यात येईल. कॉम्प्युटर सॉफ्टवेअर (Computer Software) द्वारे हेडफोन्स् (Headphones) मधून एका नंतर एक अशा प्रकारे दोन्ही कानात आवाज देण्यात येईल व प्रतिसाद नोंदविण्यात येईल. तुमच्या शारिरीक स्थितीबद्दल काही प्रश्न विचारण्यात येतील त्याची उत्तरे देणे अनिवार्य आहे.

**अभ्यासाचे फायदे :—**

सेकंडरी टाईप ऑफ बी.पी.पी.व्हि. सोबतच काही अंतर्कर्णाचे दोष असु शकतात. बी.पी.पी.व्हि. सोबतच असलेले अंतर्कर्णाचे दोष शोधण्यासाठी व त्याचे वर्गीकरण करण्यासाठी अभ्यास कार्याच्या शेवटी ऑडिओव्हेस्टिब्युलार चाचण्या करण्यात येतील.बी.पी.पी.व्हि. व अंतर्कर्णाचा दोष शोधला जाईल तेव्हा रूग्णाचे समुपदेशन व पुनर्वसन करण्यात येऊ शकते .

विविध व्यक्तिमंध्ये त्यांच्या जीवनाच्या दर्जावर विविध प्रकारे परिणाम झालेला आढळून येऊ शकतो. ज्या प्रमाणात व्यक्तिच्या जीवनाच्या दर्जावर परिणाम झालेला आहे त्यावरून सदर बी.पी.पी.व्हि. ची तीव्रता कळून येईल.

**संशोधन अभ्यासात सहभागी होण्यापूर्वी जाणून घ्यावयाची इतर माहिती :—**

संशोधन अभ्यासात भाग घेणे केवळ स्वेच्छेवर अवलंबून आहे. तुम्हाला या संमती पत्राची स्वाक्षरी केलेली प्रत देण्यात येईल. जोपर्यंत तुम्ही विचारलेलया प्रश्नांची तुम्हाला सामाधानकारक उत्तरे

मिळत नाहीत तोपर्यंत संमतीपत्रावर स्वाक्षरी करू नये. तुम्ही केव्हाही संशोधनातील तुमचा सहभाग काढून घेऊ शकता. तुम्ही जर तुमचा सहभाग ठेवला तर तुम्हाला त्यातून उपचार प्रक्रियेची महत्वपूर्ण माहिती मिळू शकते.

बी.पी.पी.व्हि.असलेल्या व्यक्तिंच्या जीवनाचा दर्जा सुधारण्यासाठी याची महत्वपूर्ण मदत होईल तसेच सामाजिक सहभाग व वैयक्तिक विकासासाठी देखील मदत होईल.

**शंका निरसन करण्यासाठी संपर्क :**

.........................................
.......................................................
.......................................................
.......................................................
........................................................

**संशोधक व्यक्तिचे नाव व सही**

**तारीख:** **ठिकाण:**